Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue –V September – October 2024

# दशनाम गोसावी व त्यांच्या संप्रदायाचा अभ्यास

संशोधिका
**पुरी सुजाता नवनाथ**
पीएच. डी.
समाजशास्त्र विभाग

मार्गदर्शक
**डॉ. मस्के दिलीप सिताराम**
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)
वेणुताई चव्हाण प्रतिष्ठाण संचलित
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
अंबाजोगाई, जि. बीड.

➢ **प्रस्तावना :**

दशनाम गोसावी ह्या समाजाची स्थापना आद्यगुरु शंकराचार्य यांनी केली. दशनाम धारण करणारे गोसावी व त्यांचा संप्रदाय या विषयी पुष्कळसा गैरसमज आहे. कित्येक 'गोसावी हे अवैदिक शैव' आहेत असे समजतात तर कित्येक त्यांना 'शैव संन्याशी' म्हणजे "जे संन्याशी नव्हते" अर्थात 'अवैदीक संन्याशी' समजतात. कित्येकांच्या मते ते नाथ संप्रदायी आहेत. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास त्यांच्याविषयी व त्यांच्या संप्रदायाविषयी पुष्कळशी माहिती नाही म्हणून ह्या संशोधनाचा विषय दशनाम गोसावी व त्यांचा संप्रदायाचा अभ्यास असा घेतला आहे.

cc BY Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

भारतातील बहुतेक दशनाम - उपपदे धारण करणारे गोसावी हे श्री शंकराचार्याच्या अद्वैत मताचे अनुयायी आहेत. बंगाल मधील गोसावी हे चैतन्याचे वैष्णव मताचे अनुयायी आहेत अथवा तिकडील वैष्णव संप्रदायाचा पाया त्यांनीच घातला असे म्हटले तरी चालेल.

वल्लभ संप्रदायाचे गोकुलिये गोसावी व गिरी, पुरी, भारती इत्यादी उपनाम धारण करणारे गोसावी यांचा संबंध नाही. परंतु प्राचीन काळी संबंध असावा असे स्वामी विवेकानंदाच्या व्याख्यानावरून आपणास दिसून येते. स्वामी विवेकानंदांनी कोलंबो ते अलमोरा या व्याख्यान मालेतील एका व्याख्यानात असे सांगितले की, "श्री चैतन्य हे साध्वपुरीचे शिष्य व माध्वपुरी हे प्राचीन आचार्य परंपरेपैकी आणि वल्लभ संप्रदाय हा चैतन्य संप्रदायापासून निघाला म्हणजे आचार्यांच्या संप्रदायाची ही एक उपशाखा आहे मात्र

ती आज वैष्णव संप्रदाय म्हणून प्रसिद्ध आहे. दशनाम गोसावी हे आचार्यांचे कट्टर अनुयायी पण त्यांनी प्राचीन नारायणीय धर्म सोडला नाही. हे गोसावी व नारायणीय धर्म व गोसावी व राजकारण या प्रकरणावरून आपणास लक्षात येते.

➢ **दशनाम गोसावी संप्रदाय :**

भारताचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, भारतामध्ये पूर्वी यज्ञ यागाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. कालांतराने ह्या सर्व गोष्टी मागे पडून उत्तरवेदकालीन संन्यास भरभराटीस आला. असे म्हणतात त्याचा फायदा घेऊन बुद्धाने आपला बौद्ध धर्म स्थापन केला. या बौद्ध धर्माची भरभराट इ.स. २०० पर्यंत टिकून नंतर ब्राह्मणी धर्म व संस्कृत भाषा यांना चढती करू लागली. तिसऱ्या शतकात गुजरात व सुराष्ट्र येथील क्षेत्रीय राजांनी त्याचा पुरस्कार केला. त्यानंतर पाचव्या शतकात तर गुप्तकाळातील सम्राटांनी हिंदू धर्माचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात केला. गुप्त राजे बौद्ध व जैन धर्मीयांना पूर्ण सहिष्णूतेने वागवित परंतु ते स्वतः पक्के हिंदू होते. ते संस्कृत भाषेचे व पंडीतांचे आश्रयदाते असून ब्राह्मणांच्या सल्याने चालणारे होते. बौद्धांचा यज्ञयाग याला निषेध होता परंतु त्याला त्यांनी विरोध करून त्यांनी अश्वमेघासारखे यज्ञ पुन्हा सुरु केले. गुप्त काळात यज्ञाचे पुनरुज्जीवन झाले. परंतु हर्षा राजाने ह्या सर्व यज्ञकार्याला बंदी घातली. त्याकाळी बहूतेक ब्राह्मणांच्या घरातून प्राचीन वैदिक कर्ममार्गाचा अवशेष म्हणून अग्निहोम असे. त्याचप्रमाणे उत्तरवेदकालिन मार्गाचा भाग जो संन्यासश्रम त्याचे देखिल भक्त व अनुयायी हर्षकाळी पहावयास मिळतात. या संन्याशापैकी कित्येक अत्यंत सत्वशील व विद्वान असत. हर्षाचे काळी सर्व हिंदूस्थानभर बौद्ध मठ पसरले असून त्यात हजारो भिक्षू व भिक्षूनी यास आश्रय मिळे. त्याकाळी जैन, संन्याशी, श्वेतांबर जैन, श्वतवस्त्री, भिक्षु, भागवत, ब्राह्मचारण, केशलुचक सांख्य, चार्वाक, वैशेषिक, वेदांती इत्यादी अनेक मतांचे लोक अस्तित्त्वात होते. हर्षवर्धन राजा इ.स. ६४७ मध्ये मरण पावला आणि पुढे मोखरी घराण्यातील यशोवर्मा यांच्या कारकिर्दीत वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन झाले.

सातव्या शतकाच्या अखेरिस व आठव्या शतकाच्या प्रारंभी हिंदूस्थानात अनेक राज्याच्या उलथापालथी व धर्मक्रांत्या होत होत्या. लोक बौद्ध धर्म व जैन धर्मातील अहिंसेला कंटाळली होते. कुमारील भट्टासारखे मीमांसक वैदीक धर्माचा पुनरुज्जीवनाचा मार्ग निष्कंटक करित चालले होते. एखाद्या मोठ्या जो क्रांती घडवून आणू शकेल अशा महापुरुषांची लोक प्रतिक्षा करू लागले होते. जिकडे तिकडे अशांतता पसरली होती. अशा वेळी श्री शंकराचार्याचा जन्म झाला आणि त्याचबरोबर दशनाम गोसाव्यांचा संप्रदाय अर्थात अद्वैत संप्रदायाचा उदय झाला.

भारतात बुद्धाच्या वेळी लोकांनी यज्ञयागाचा कंटाळा आला होता. म्हणून बुद्धांना बौद्ध धम्माचा प्रसार करणे सोपे गेले. त्यानंतर तर्कशास्त्र व बौद्धिक विचारांचा फैलाव झाला. हा प्रकार हजार बाराशे वर्ष चालल्यावर तर्कावर रचलेल्या धर्मज्ञानाचा लोकांस कंटाळा आला. लोक पुन्हा शुद्ध प्रमाणाकडे प्रवृत्ती झाली. पूर्व मिमांसाने शुद्ध प्रमाणाचे नियम घालून दिले व श्री शंकराचार्यांनी त्या नियमास अनुसरुन वेदान्तशास्त्र तयार केले. त्यामुळे सनातन वैदिक धर्माची स्थापना होऊन लोकांची चंचलवृत्ती स्थिर होवून ब्रह्मज्ञानाकडे लक्ष लागले. आचार्याचा अद्वैतवाद व मायावाद यांनी राष्ट्रात विलक्षण क्रांती घडवून आणली.

आचार्यांनी हे महत्त्वाचे कार्य अगदी बालवयापासूनच हाती घेतले. वैदिक धर्माच्या स्थापनेकरीता त्यांनी सर्व भारतभर प्रवास केला. मुख्य चार दिशास चार मठ स्थापन केले. पूर्वीचा विस्कळीत गोसावी समाज नियमबद्ध केला. आपल्या शिष्यांपैकी अधिकारी विद्वानांची या पीठावर स्थापना केली आणि सर्वत्र अद्वैत मताचा प्रसार केला. हे कार्य करण्यास आचार्यांना त्यांचे गिरी, पुरी, भारती नामा शिष्याचे फार सहाय्य झाले. या शिष्यापासूनच दशनाम संन्यासाची निर्मिती झाली. इतरांप्रमाणे गृहस्थ गोसावी ही आचार्याचे शिष्य झाले. अर्थात त्यांनी आचार्यांचा अद्वैत संप्रदाय उचलला.

**संप्रदायातील गुरु शिष्य परंपरा :**

**श्री शंकराचार्य**

**१) तोटकगिरी ऊर्फ त्रोटकाचार्य (ज्योतिर्मठ)**

**बदरीकेदार (गिरी, पर्वत, सागर)**

- नारायण गिरी → दयानंदगिरी → कृष्णानंदगिरी → हरहरनंदगिरी → देवानंदगिरी → सच्चिदानंदगिरी → अच्युत्तानंदगिरी → जयतानंदगिरी → सदानंदगिरी
    - कारागिरी
    - रामदत्तगिरी
    - वेदगिरी
    - ब्रह्मगिरी
    - मेघनाथगिरी
    - अपारनाथगिरी
- पूर्ण पर्वत → गोपनाथपर्वत
- रामसागर

**२) स्वरूपाचार्य (शारदामठ-द्वारका)**


**तीर्थ आश्रम**

- कच्छतीर्थ
- कुर्माश्रम

Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIII Issue –V September – October 2024

३) पृथ्वोद्धाराचार्य (शृंगेरी मठ)

४) पद्माचार्य (गोवर्धनमठ) जगन्नाथपुरी
वन अरण्य



यावरून दशनाम गोसावी हे आचार्यांचे सांप्रदायिक शिष्य आहेत हे स्पष्टपणे ध्यानात येईल. श्री आचार्यानी आपले संप्रदायाचे प्रचारार्थ चार मंठाची योजना करून प्रत्येक मठाचे अनुयायी देव, देवता, वेद, ब्रह्मचारी, महावाक्य, अधिकार क्षेत्र वगैरे नियम घालून दिले. हे नियम संन्यासाकरीता आहेत की गोसाव्याकरीता (गृहस्थ) हा वाद न करता एकंदर व्यवस्थेवरून ते गृहस्थ गोसाव्याकरीता आहेत असे समजून येते. कारण त्या काळी संन्याशास तीन रात्रीपेक्षा एका ठिकाणी अधिक राहण्याला परवानगी नव्हती. संन्याशी हे घर, संसार, या पासून अलिप्त राहत असत. असे अनेक पुराव्यावरून स्पष्ट होते. त्यामुळे हे सर्व नियम गृहस्थ गोसाव्या करीता होते.

शृंगेरी मठ, गोवर्धन मठ, ज्योतिमठ किंवा जोशी व शारदा हे मठ विशेषत: घरबारी गोसाव्याकरीता निर्माण केलेले दिसतात.

**नाथउपपद :**

'नाथ' हे उपपद गिरीनामध्ये मठांच्या पुढे लावतात, त्यावरून गोसावी संपद्राय हा 'नाथ' संप्रदायाच्या मागाहून निघाला असे कित्येक समजतात पण ते चुकीचे आहे. नाथ म्हणजे श्रेष्ठ स्वामी यती हे आपल्या नावापुढे उपपद लावीत. ही गोष्ट आचार्यांचे गुरु जे गोविदयति त्यांच्या नावावरून सिद्ध होते. त्यांना गोविंदनाथ यति असे म्हटले आहे. गिरी म्हणजे ज्ञानी-श्रेष्ठ या अर्थाने प्राचीन वाङ्मयात उल्लेख आढळतो. याचेच द्योतक 'नाथ' हे उपपद ते आपणास लावू लागले. नाथ संप्रदाय १३ वे शतकात स्थापन झाला व गिरी संप्रदाय वेदकालचा आहे. तेव्हा नाथ संप्रदायापासून गिरी किंवा गोसावी संप्रदाय निघाला असे म्हणणे अनैतिहासिक आहे.

**पोट संप्रदाय :**

गोसाव्याचे मुख्य मठ जसे चार तसे पोट संप्रदायही चार आहेत. म्हणजे प्रत्येक मठाचा वेग-वेगळा आहे. त्यांची नावे १) कीटवार २) भोगवार ३) अनांदवार व ४) भूरीवार हे आहेत.

**सारांश :**

महाराष्ट्रामध्ये श्री रामदास स्वामीचा भगवा झेंडा फडकण्याचे अगोदर निदान सातशे वर्ष तरी गोसावी समाजाचा भगवा झेंडा उत्तर हिंदूस्थानात विशेषत: प्रभावाने फडकत होता. गोसावी समाजाने मुसलमानांचा जुलूम रोखून धरला. इतकेच नव्हे तर राजपूतांना तोबा-तोबा करायला लावला. राजकारण व धर्म यांचा एक जीव करून तो स्वर्गीय कुंसुंबा रजपुतांना आकंठ प्राशन करावयास लावून त्यांचे प्रत्येक धमणीतून तो रसरसून बाहेर पडावयास लावण्याचे श्रेय या गोस्वामी समाजास जाते या अलौकिक कर्तबगारीचा स्फूर्तिदायक इतिहास रजपुतांच्या सोज्जवळ इतिहासाशी समरस झालेला आहे. तो प्रामुख्याने पुढे मांडण्याचे कार्य आजपर्यंत कोणीच केले नाही. त्यामुळे तो जवळ-जवळ अज्ञात स्थितीतच पडून आहे. त्यामुळे ह्या अभ्यासामुळे सर्वांना ज्ञात होईल.

➢ **संदर्भ ग्रंथसूची :**

१) आगलावे, प्र. (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रकाशन.

२) पंडीत, ब. बी. (१९८७), शिक्षणातील संशोधन पद्धती (प्र.आ.) पुणे : नित्यनुतन प्रकाशन.

३) www.onlineshodhganga.in